# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १७/१२/२०१५**

**सायं ४.०० वा.**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. ०९/११/२०१५ रोजीचे इतिवृत्त माहितीसाठी सादर.</td><td>ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. ०९/११/२०१५ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक - पांडुरंग इंगळे सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रश्नोत्तरे</td><td>
<table>
<tr><td>१</td><td>१७/१२/२०१५</td><td>श्री. धनंजय विठ्ठल गावडे</td><td>१)प्रभाग समिती क आणि इ येथील सामान्य प्रशासान विभागाचे व्यवस्थापनासाठी मे. क्लासिक एंटरप्रायझेस व मे. युनिव्हर्सल एंटरप्रायजेस या ठेकेदारांना कोणते, किती युनिट, कालावधी व किती दराने कंत्राट देणेत आले आहे? २) उक्त ठेकेदारांनी किमान वेतन कायद्यानुसार प्रति युनिट किती मासीक दर देणे अपेक्षित होते? ३) प्रत्यक्षात मासिक किती दर अदा केले आहेत ?</td><td>१) मा. उपायुक्त (आस्था) २) मा.सहा.आयुक्त (आस्था) दि. २७/११/२०१५</td></tr>
<tr><td>२</td><td>१७/१२/२०१५</td><td>श्री. धनंजय विठ्ठल गावडे</td><td>१)प्रभाग क्र. ३२,३३,३४,३६,३७,३८ व ५२ साठी ठेकेदाराबरोबर करणेत आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामगारांचे राष्ट्रीयकृत बँकात खाते उघडणे, वेतन धनादेशाद्वारे जमा, बँकेचे नाव, वेतन इ. तपशिल घ्यावा. तशी पुर्तता केली नसल्यास त्यास जबाबदार असणाऱ्याचे नाव व हुद्दा व म.न.पा.ने केलेल्या कारवाईची माहिती. २) बायोमॅट्रिक मशिन कोणत्या कंपनीची? I.S.I दर्जा होता काय? ठेकेदारास दिलेले वेतन बायोमेट्रीक मशिनीनुसार दिले काय? तशी पुर्तता केली नसल्यास जबाबदार असणाऱ्याचे यांचे नाव व हुद्दा व त्यांचेवर म.न.पा.ने केलेल्या कारवाईची माहिती</td><td>१) मा. उपायुक्त (आरोग्य) २) मा.सहा.आयुक्त (आस्था) ३) मा.सहा.आयुक्त (भांडार)</td></tr>
</table>
अनुमोदक - कल्पेश मानकर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ३ | **शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव** | १ मा. उपसिचव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग (नवि-२०), मंत्रालय, मुंबई - ३२ (शासन परिपत्रक)<br>२ मा. उपसिचव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग (नवि-२०), मंत्रालय, मुंबई - ३२ (शासन परिपत्रक)<br>३ मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय (नवि-३४), मुंबई ३२ (शासन निर्णय)<br>अनुमोदक - भारती देशमुख सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ४ | **स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा महानगरपालिका मा. सर्वसाधारण सभेमध्ये आढावा घेण्याबाबत.** | **ठराव :-** वरील प्रस्तावात अवगत केल्यानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या महत्वाकांक्षी योजनेची महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजना व प्रस्तावित उपाययोजनांना ही सभा मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ५ | **मे. वरद इंजिनिअरींग यांना मुदत बाह्य बिलाची रक्कम अदा करणेबाबत.** | **ठराव / निर्णय :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. प्रस्तावातील कामगार राज्य विमा योजनेची रक्कम रू. ३,०७,१५८/- ऐवजी रू. ३,६०,१५८/- नमुद करणेस व याबाबत मे. वरद इंजिनियरिंग यांना त्यांनी भरलेली कामगार राज्य विमा योजना व भविष्य निर्वाह निधीची एकूण रक्कम रू. १३,७४,०८२/- अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ६ | **कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर), उप-आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, ही पदे थेट मुलाखती द्वारे (Walk in interview) तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्यांकरीता भरणेबाबत.** | **ठराव / निर्णय :-** प्रशासनाकडून महासभेपुढे सादर करण्यांत आलेला प्रस्ताव विचारात घेता कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) व उपआपत्ती व्यवस्थापन अधिकारी या दोन्ही महत्वाच्या पदांवर स्थायी कर्मचाऱ्यांची नेमणूक होईपर्यंत ही दोन्ही पदे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५१ व कलम ५४ मधील तरतुदीनुसार थेट मुलाखतीद्वारे (Walk in Interview) दरमहा रू. २५,०००/- (रूपये पंचवीस हजार मात्र) इतक्या ठोक वेतनावर सेवाप्रवेश नियमातील पात्रता व अर्हतानुसार तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्यांकरीता भरण्यास ही महासभा मंजुरी देत आहे.<br>तसेच मा. सदस्यांनी उपस्थित केलेली उपसुचना मान्य करून उद्यान अधिक्षक - १ पद, सहाय्यक उद्यान अधिक्षक - २ पदे, प्रमुख माळी - ३ पदे ही पदे सेवाप्रवेश नियमातील पात्रता व अर्हतानुसार प्रशासन निश्चित करील अशा ठोक वेतनावर थेट मुलाखतीद्वारे (Walk in Interview) भरण्याचे निर्देश ही महासभा प्रशासनास देत आहे. तसेच उपरोक्त सर्व पदांच्या वेतनासाठीचे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता ही महासभा देत आहे.<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वानुमते मंजुर |

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक २०/०१/२०१६**

**सायं ४.३० वा.**

| अ.क्र. | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १७/१२/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १७/१२/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक - संदिप पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २ | प्रश्नोत्तरे | १ \| २०/१/२०१६ \| श्री. धनंजय विठ्ठल गावडे \| सन २०११ पासून रस्ते सफाई, औषध फवारणी, गटार सफाईकामी मे. उजाला लेबर कॉन्ट्रेक्टर, मे. अनंत एंटरप्रायजेस, मे. हेना एंटरप्रायजेस, मे. दिनेश संखे, मे.रिलायबल एजन्सी, मे.स्वागत लेबर, मे.लोकसेवा सर्व्हिसेस, मे. साई गणेश, मे.शिवम एंटरप्रायजेस, मे.आर.बी. इन्फ्रा. या ठेकेदारांनी ठेका कामगारांची हजेरी बायोमेट्रीक पध्दतीने घेतली काय ? त्यानुसार वेतन दिले काय ? केलेला ठराव, करारनाम्यातील अटी/शर्तीचे उल्लंघन त्यास जबाबदार ठेकेदार व अधिकारी कोण ? त्यांचेवर केलेली कारवाई. \| १) मा. उपायुक्त (आस्था)<br>२) मा. सहा. आयुक्त (आस्था)<br>३) मा. सहा. आयुक्त (आरोग्य व स्वच्छता)<br>अनुमोदक - संदिप पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ३ | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव | १ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, (शासन निर्णय) मंत्रालय, मुंबई - ३२<br>अनुमोदक - प्रकाश रॉड्रीक्स सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ४ | श्रीमती विधीता विजय वळंजे यांना लाड कमिटी शिफारसी नुसार सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबत. | **निर्णय/ ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-आय, वसई येथील सफाई कर्मचारी कै.विजय महादेव वळंजे यांचे सेवेत असताना दि. २१ डिसेंबर,२०१४ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पत्नी श्रीमती विधिता विजय वळंजे (वय ३९) या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सफाई -२०१५/प्र. क्र. २६८/ महामंडळे, दिनांक १० नोव्हेंबर २०१५ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड कमिटीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावून घेणेस हि महासभा मान्यता देत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | अनुमोदक - नितिन दिनानाथ राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती आय वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती लक्ष्मी भगवान वाघ, सफाई कामगार यांना स्वेच्छानिवृत्ती देणेबाबत. | **निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती लक्ष्मी भगवान वाघ यांना मणक्याचा आजार असल्याने मणक्यावर शस्त्रक्रिया केली आहे व शस्त्रक्रियेनंतर त्यांना शारिरिक थकवा जाणवत असल्याने महानगरपालिका सेवेतील स्वेच्छा निवृत्ती मिळणेबाबत विनंती केली आहे. श्रीमती लक्ष्मी वाघ यांची २० वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाली असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(१) नुसार त्यांची स्वेच्छा निवृत्तीची नोटीस स्विकारुन नोटीसीस तीन महिने पुर्ण झालेनंतर दिनांक ०१/०२/२०१६ रोजी मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छा निवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्रीमती लक्ष्मी वाघ यांना स्वेच्छा निवृत्तीनंतरचे देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.<br>अनुमोदक - नितिन दिनानाथ राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ६ | श्रीमती वासंती शिवराम पवार, सेवानिवृत्त सफाई कामगार यांची मुलगी सुजाता शिवराम पवार यांना लाड कमिटी शिफारसी नुसार सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबत. | **निर्णय/ठराव :-** नगर विकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक ११/८/२००६ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक दिनांक २१/१०/२०११ नुसार लाड समितीचे शिफारसीनुसार वारसा हक्क पध्दतीने श्रीमती वासंती शिवराम पवार यांची वारस मुलगी कु. सुजाता शिवराम पवार यांना महानगरपालिकेच्या सेवेत "सफाई कामगार" या पदावर नियुक्ती देण्यास आजची ही महासभा मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - प्रज्ञा देसाई सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ७ | वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील मयत सफाई कामागाराच्या वारसास वारसाहक्क पद्धतीने महानगरपालिका सेवेत समावून घेणेबाबत. | **ठराव / निर्णय :-** नगर विकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक ११/८/२००६ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक दिनांक २३/१०/२०११ नुसार लाड समितीचे शिफारसीनुसार वारसा हक्क पध्दतीने श्री. सोमा भिका सोलंकी यांचा वारस मुलगा श्री. कालिदास सोमा सोलंकी यांना महानगरपालिकेच्या सेवेत "सफाई कामगार" या पदावर नियुक्ती देण्यास आजची ही महासभा मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - नितिन दिनानाथ राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ८ | श्री. सुखदेव दरवेशी, स्वच्छता निरीक्षक, वसई-विरार शहर महानगरपालिका | **ठराव/निर्णय :-** श्री. सुकदेव दरवेशी, स्वच्छता निरिक्षक यांचेविरुध्दच्या शिस्तभंगाच्या कारवाईसंदर्भात प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सदर प्रस्ताव सध्या तहकूब ठेवावा, असा निर्णय ही महासभा एकमताने घेत आहे. |

<table>
<tr><td></td><td>यांचेविरूध्दच्या विभागीय चौकशीच्या अहवालावर निर्णय घेणेबाबत.</td><td>अनुमोदक - धनंजय गावडे सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>९</td><td>श्रीमती संध्या सबनिस, सहा. अंतर्गत लेखा परिक्षक, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचेविरूध्दच्या विभागीय चौकशीच्या अहवालावर निर्णय घेणेबाबत.</td><td>ठराव/निर्णय :- श्रीमती संध्या सबनीस, सहाय्यक अंतर्गत लेखा परीक्षक यांचेविरुध्दच्या शिस्तभंगाच्या कारवाईसंदर्भात प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सदर प्रस्ताव सध्या तहकूब ठेवावा, असा निर्णय ही महासभा एकमताने घेत आहे.<br>अनुमोदक - चंद्रकांत गोरीवले सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>१०</td><td>१) श्री. सुरेश थोरात, वरिष्ठ लिपिक, २) श्री. अरविंद नाईक, वरिष्ठ लिपिक, ३) श्री. विजय पाटील, लिपिक, ४) श्री. निंबा पवार, वरिष्ठ लिपिक या चार कर्मचाऱ्यांचे निलंबनाबाबत.</td><td>ठराव/निर्णय :- १) श्री. सुरेश थोरात, वरीष्ठ लिपीक, २) श्री. अरविंद नाईक, वरीष्ठ लिपिक, ३) श्री. विजय पाटील, लिपीक, ४) श्री.निंबा पवार, वरिष्ठ लिपीक या चारही निलंबित कर्मचाऱ्यांना निर्वाह भत्ता दिला जातो, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. यास्तव या कर्मचाऱ्यांना घरी बसून निर्वाह भत्ता देण्यापेक्षा त्यांना त्यांचेविरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीतील निर्णयाच्या अधिन राहून सेवेत पुन:स्थापित करावे, जनतेशी थेट संपर्क नसलेल्या अकार्यकारी पदावर त्यांची नेमणूक करावी तसेच त्यांचेविरुध्दची विभागीय चौकशी लवकर पूर्ण होईल, यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी व त्याबाबतची माहिती महासभेस अवगत करावी, असा निर्णय ही महासभा घेत आहे.<br>अनुमोदक - चंद्रकांत गोरीवले सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>११</td><td>सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिकेस अभिकर्त्यामार्फत विविध सेवा प्राप्त करून घेणेकामी वार्षिक ई-निविदा मागविणे कामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.</td><td>ठराव/निर्णय :- महानगरपालिकेच्या एकुण नऊ प्रभाग समित्या आहेत. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सध्याचा कार्यरत कर्मचारीवर्ग अपुरा पडत असल्याने बांधकाम, पाणीपुरवठा, सामान्य प्रशासन, सार्व. आरोग्य, सार्व. वाचनालय, अग्निशमन विभाग, वाहन, महिला व बालकल्याण, दिवाबत्ती इत्यादी विभागातील प्रशासकीय, विकास व तांत्रिक कामे करण्यासाठी सन २०१४-१५ साठी मनुष्यबळ पुरवठा करणेकामी अभिकर्त्याची नेमणूक करण्यात आली होती. या अभिकर्त्याची मुदत दिनांक ३१/३/२०१५ रोजी संपत असल्याने सन २०१५ - २०१६ या वित्तीय वर्षासाठी मनुष्यबळ पुरवठा करणेकामी अभिकर्ता नेमणे गरजेचे असल्याने मा. महासभा ठराव क्र.१९ दि.१४/०१/२०१५ अन्वये आर्थीक व प्रशासकिय मान्यता दिलेली होती. दरम्यानच्या काळात मा.स्थायी समिती, ठराव क्र.८० दिनांक १३/०४/२०१५ अन्वये पुढील निविदा प्रक्रीया होईपर्यंत संध्याच्या अभिकर्त्यास मुदतवाढ दिलेली असुन त्यांची देयके अदा करणेस आर्थीक व प्रशासकिय मंजुरी दिलेली आहे.<br>विविध प्रशासकीय, विकास व तांत्रिक कामे करण्यासाठी कार्यरत कर्मचारी अपुरा पडणार असल्याने सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी खाली नमुद केलेल्या मंजुर रिक्त पदांवर ई-निविदा प्रक्रीया राबऊन अभिकर्त्यामार्फत कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नेमणुक करण्यास ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>संवर्ग</th><th>मंजुर पदे</th><th>भरलेली पदे</th><th>बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटीपध्दतीने मागणी करावयाच्या पदांची संख्या</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr>
<tr><td>१</td><td>लिपीक टंकलेखक</td><td>४०५</td><td>२००</td><td>२०५</td></tr>
</table></td></tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><td>२</td><td>ग्रंथपाल</td><td>२</td><td>-</td><td>२</td></tr>
<tr><td>३</td><td>सहा.ग्रंथपाल</td><td>८</td><td>१</td><td>७</td></tr>
<tr><td>४</td><td>आरोग्य निरीक्षक</td><td>४८</td><td>७</td><td>३९</td></tr>
<tr><td>५</td><td>कनिष्ठ अभियंता ( स्थापत्य )</td><td>१३५</td><td>-</td><td>७०</td></tr>
<tr><td>६</td><td>कनिष्ठ अभियंता ( विद्युत )</td><td>२९</td><td>१</td><td>५</td></tr>
<tr><td>७</td><td>कनिष्ठ अभियंता ( यांत्रिक )</td><td>८</td><td>-</td><td>२</td></tr>
<tr><td>८</td><td>कनिष्ठ अभियंता ( Computer Software)</td><td>७</td><td>-</td><td>१</td></tr>
<tr><td>९</td><td>कनिष्ठ अभियंता (Computer Hardware)</td><td>२</td><td>-</td><td>१</td></tr>
<tr><td>१०</td><td>फायरमन</td><td>१४७</td><td>१२</td><td>१३४</td></tr>
<tr><td>११</td><td>चालक यंत्र चालक, अग्निशमन विभाग</td><td>४२</td><td>१४</td><td>२८</td></tr>
<tr><td>१२</td><td>लघुटंक लेखक</td><td>९</td><td>-</td><td>४</td></tr>
<tr><td>१३</td><td>तारतंत्री</td><td>२४</td><td>२०</td><td>४</td></tr>
</table>
शासनाने महानगरपालिकेसाठी २८५२ पदांचा आकृतीबंध मंजुर केला आहे. वरील कोष्टकातील नमुद पदांव्यतीरीक्त आकृतीबंधातील अन्य मंजुर रिक्त पदांवर कर्मचाऱ्यांची अभिकर्त्यांमार्फत कंत्राटी पध्दतीने नेमणुक करण्यास, तसेच वेळोवेळी कामाची निकड लक्षात घेऊन, जी कामे गरजेनुसार आऊटसोर्सिंग तत्वावर करणे आवश्यक आहे, अशी कामेसुध्दा विहित पध्दतीने ठेकेदाराची नेमणूक करुन पार पाडण्यास ही महासभा मान्यता देत आहे.<br>
अनुमोदक - रुपेश जाधव सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>
ठराव सर्वानुमते मंजुर
</td>
</tr>
<tr>
<td>१२</td>
<td>प्रभाग समिती ई कार्यालय क्षेत्रातील तामतलाव विकसित करणेच्या कामास सुधारीत प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.</td>
<td>ठराव / निर्णय : - वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. ३,५९,५३,६०५/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा सुधारित प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून सदरचे काम मुळ ठेकेदाराकडुन करुन घेणेस, तसेच त्याकामी अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे .<br>
अनुमोदक - प्रविण शेट्टी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>
ठराव सर्वानुमते मंजुर</td>
</tr>
<tr>
<td>१३</td>
<td>महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती एच मधील वॉर्ड नं. ९६ मधील तुळजाभवानी मंदिर उद्यान परिसर</td>
<td>ठराव / निर्णय :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद केलेल्या प्रभाग समिती एच मधील वॉर्ड नं. ९६ मधील तुळजा भवानी मंदिर उद्यान परिसर विकसीत करणेचे कामाचा कार्यादेश देण्यांत आलेला होता. प्रत्यक्षात काम सुरु केलेले होते. प्रत्यक्ष कामाचे वेळी स्थानिक नागरीकांचे मागणी नुसार तलावाचे खोलीत वाढ प्रस्तावित केली त्यामुळे परिमाणात वाढ</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | विकसीत करणेचे कामाचे सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | होत आहे. मुळ अंदाजपत्रक रु. १,४६,३०,४९३/- इतके होते. झालेल्या बदलानुसार रु. २,२७,७६,७००/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार केलेले आहे. त्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यांत येत आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेऊन सदरचे काम मुळ ठेकेदाराकडून करुन घेण्यास ही सभा मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - प्रकाश रॉड्रीक्स सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १४ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या विविध योजनांची व विकास कामांची माहिती नागरीकांना उपलब्ध करुन देण्यासाठी जाहिरातीद्वारे प्रसिध्दी करणेबाबत. | **ठराव/निर्णय :** प्रस्तावित केल्यानुसार महानगरपालिकेच्या विविध योजनांची व विकासकामाची माहिती नागरीकांना होण्याकरीता ह्या जाहीरात प्रसिध्दीसाठी मे. भागिरथी ट्रान्स कार्पो प्रा. लि. ह्यांच्येकडील परिवहन सेवेच्या ११९ बसेस व ११४ बस स्टॉप कार्यादेश दिल्यापासुन सहा महिन्याच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्यास व त्याकामी होणाऱ्या रक्कम रु. १,१२,६५,७५०/- पर्यंतच्या खर्चास तसेच सदरची देयके अदा करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - अब्दुल हक पटेल सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १५ | विरार पूर्व विभागातील वाहतुकी संदर्भात झालेल्या बैठकीबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** सदर कामी विरार (पू.) साठी वरीलप्रमाणे वाहतूकीचे नियोजन करण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पालघर ह्यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावा व ह्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही मा.आयुक्त ह्यांनी करावी असे ही सभा ठरवित आहे. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १६ | केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानात वसई विरार शहर महानगरपालिकेस सहभाग घेण्याबाबत. | **निर्णय -** सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली व असे ठरविण्यात आले की, केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानात वसई विरार शहर महानगापालिकेने सहभाग घ्यावा तसेच सदर अभियाना च्या अनुषंगाने अर्थसंकल्पात नव्याने लेखाशिर्ष अंर्तभूत करुन प्राप्त होणा-या अनुदानसह तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे. महानगरपालिकाक्षेत्रात सदर अभियान राबविण्यासाठी विविध प्रकल्पांसाठी DPR तयार करुन शासनास पाठविणे या कामी सल्लागार निमणूक करण्यास , व पाणीपुरवठा, मलनिस्सारण, पर्जन्यजलवाहिनी, मलव्यवस्थापन विषयक व त्या अनुषंगिक प्रकल्पाचे नियोजन, कार्यान्वयन, पर्यवेक्षण व अंमलबजावणी प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची शासन निर्णयानुसार नेमणूक करण्यास , महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ३% इतके प्रकल्प व्यवस्थापन शुल्क प्रमाणे अदा करण्यास, सदर अभियांनाच्या अनुषंगाने स्वतंत्र बँक खाते उघडून शासनाकडून प्राप्त होणाऱ्या मंजूर वित्तीय आकृताबंधानुसार महानगरपालिकेचा हिस्सा जमा करण्यास तसेच याबाबत आवश्यक ती सर्व पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना प्रदान करण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - वृंदेश पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १७ | महिला व बालकल्याण कार्यक्रमाच्या | **निर्णय :-** महिला व बालकल्याण विभागाच्या मागणीनुसार सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात महिला व बालकल्याण विभागामार्फत |

| | | |
|---|---|---|
| | विविध योजना या लेखाशिर्षात निधी वर्ग करुन मिळणेबाबत. | राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांकरीता मंजुर निधी अपुरा झाल्यामुळे महिला व बालकल्याण कार्यक्रमाच्या इतर योजना व कार्यक्रम या लेखा शिर्षकात अंदाजे लागणारा २,००,००,०००/- रु निधी वर्ग करुन या निधीतुन विविध योजना राबविण्यात याव्या या कामी ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - भारती देशमुख सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| १८ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दित "स्वच्छ महाराष्ट्र अभियान" अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी PPP तत्वावर सार्वजनिक शौचालये बांधणेसाठी (Pay and use) NGO कडून अर्ज मागविणेकामी मा. सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दित "स्वच्छ महाराष्ट्र अभियान" अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी PPP तत्वावर सार्वजनिक शौचालये बांधणेसाठी (Pay & Use) अशासकीय संस्थाकडून विहीत पद्धतीने अर्ज मागविणेसाठी तसेच प्राप्त अर्जानुसार सार्वजनिक स्वच्छतागृहांचे काम करणेस इच्छूक अशासकीय संस्थाना मा.स्थायी समितीचे मान्यतेने वाटप करणेस ही सभा मंजूरी देत आहे. ह्याबाबत अशासकीय संस्थाशी ५ वर्षाचा नाममात्र रु.१/- वार्षिक भाडेतत्वावर करार करणेत यावा व त्यांची गुणवत्ता तपासून सदर करार ९ वर्षांपर्यत वाढविणेत यावा तसेच ह्याबाबत इतर सर्व अनुषंगीक निर्णय घेणेचे अधिकार त्याचप्रमाणे नव्याने अतिरिक्त जागा आढळून आल्यास त्या समाविष्ट करणेचे अधिकार मा.आयुक्तांना देणेत येत आहेत.<br>अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| १९ | केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांच्या अनुषंगाने महानगरपालिका अधिनियमांमध्ये असलेल्या तरतुदींनुसार वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील गरीबी कमी करण्यासाठी प्रस्तावात सविस्तरपणे नमुद केल्यानुसार गरीबांसाठी मदतीची तरतुद करणे, सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्य, सोय व शिक्षण यांचे संवर्धन होण्यासाठी उपाययोजना करणे आणि अंध, अपंग व अन्य शारीरिक व्याधीग्रस्त, अनाथ, निराश्रित, विधवा, निराधार, परितक्त्या, घटस्फोटीत महिला, ज्येष्ठ नागरीक, विद्यार्थी, विद्यार्थीनी, मागसवर्गीय, दारिद्रियरेषेखालील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, खेळाडू, कलाकार, साहित्यिक यासारख्या समाजातील विविध | ***निर्णय ठराव/:- उपरोक्त प्रस्ताव व त्यात अतंर्भुत असलेल्या वैयक्तिक लाभांच्या योजनासंस्था अन ,ुदान व अन्य सहाय्य , विकास कामे यासाठी प्रस्तावित केलेले आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणेकामी सर्वसाधारणपणे पूर्तता करावयाचे नियम व अटींसह प्रस्तावाची अमंलबजावणी करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुदी करणेस आजची सर्वसाधारण सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी प्रदान करीत असून यापूर्वीचे प्रलंबीत असलेले आणि विहित नियम व अटींची पुर्तता करीत असलेल्या पात्र लाभार्थाना देखील या योजनांचा लाभ देण्यांत यावा अशी आजची सभा सर्वानुमते ठरवीत आहे.***<br>अनुमोदक - संजय पिंगुळकर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |

| | | |
|---|---|---|
| | घटकांच्या कल्याणासाठी व त्यांच्यासाठी काम करणाऱ्या सेवाभावी व विश्वस्त संस्थांना सहाय्य करण्यासाठी सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना आखणे, अस्तित्वातील योजनांमध्ये सुसूत्रता आणणे, त्यात सुधारणा करणे, लाभार्थ्यांसाठी लाभाची रक्कम, सर्वसाधारण नियम व अटी ठरवणे व प्रस्तावांच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यास मंजूरी देणे. | |
| २० | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीबाबत. | **ठरावाचा निर्णय :-** वरील प्रस्तावात अवगत केल्यानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या महत्वाकांक्षी योजनेची महापालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजाणी करण्याच्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजना व प्रस्तावित उपाय योजनांना ही सभा मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - निलेश देशमुख सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |